स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 29–05–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 3. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 4. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 5. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 6. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 7. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 8. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 9. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 10. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 11. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 2. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 3. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 4. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 5. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 53ः–
{साप्रवि}

भारत सरकार नगर विकास मंत्रालय प्रणीत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियान नागपूर महानगरपालिकेत राबविण्यात येत आहे. महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियान अंतर्गत मंजूर प्रकल्प व सुधारणांच्या अंमलबजावणी, कार्यान्वयन व

देखरेखीकरिता प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची स्थापना केली आहे. प्रकल्प अंमलबजावणी कक्षात कंत्राटी स्वरूपात कार्यरत श्री. अमित मिश्रा, कंत्राटी पर्यावरण अधिकारी व श्री. संदीप लोखंडे, कंत्राटी सार्वजनिक आरोग्य अभियंता यांचा मुदतवाढीचा कालावधी दि. 31/03/2017 रोजी संपुष्टात आलेला असल्यामुळे 2 दिवसाचा तांत्रिक खंड देवून, पुढील 6 महिन्याकरिता (दि. 03/04/2017 ते दि. 30/09/2017 पर्यन्त) प्रतिमहा रू. 35,000/— मानधनावर मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 54ः— {समाज कल्याण विभाग} नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत स्पर्धा परिक्षा पुर्व प्रशिक्षण केंद्राचे सुरू करण्याकरिता नियुक्त करावयाच्या एजेंसीकरीता आवेदन मागविणे व त्या अनुषंगाने आवश्यक निकष व लाभार्थी निवडावयाच्या निकषाचा प्रश्न तसेच,

नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत स्पर्धा परिक्षा पुर्व प्रशिक्षण केंद्राचे सुरू करण्याकरिता नियुक्त करावयाच्या एजेंसीकरिता E.O.I. व्दारे आवेदने मागविण्याकरिता E.O.I. तयार करण्यात आलेला असुन आवेदन कर्त्याकरिता आवश्यक असणारे निकष तसेच या योजनेअंतर्गत नियुक्त एजेंसीला करावयाची कार्य व स्पर्धा परिक्षा पुर्व प्रशिक्षण केंद्राचे निकष, या योजनेत समाविष्ट करावयाच्या लाभार्थ्यांचे निकष ठरविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय निकषा सहीत मंजूर तसेच रितसर E.O.I. मागविण्यात यावे यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 55ः— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. ३८ ब जुना बगडगंज येथे श्री. बोदुले ते ना.सु.प्र. मैदानापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे हे काम प्राप्त निविदाकार मे. उल्हास इंटरप्राईजेस यांचे प्राकलनीय दरापेक्षा 15.27 टक्के कमी दराची रु. 34,45,721/— राशीची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. 649 A42001361002 स्पेशल गव्हर्नमेंट ग्रॅन्ड अंतर्गत प्रस्तावित आहे..

ठराव क्रमांक 56ः— {लोककर्म झोन 09} नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील कळमना गांव ते वांजरा गांव रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी. के. कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 1,49,99,997/— पेक्षा टक्के 1% जास्त दराची वाटाघाटी नंतर प्राकलनीय दरावरील निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 57ः— {लोककर्म झोन 03} शासकीय अनुदाना अंतर्गत दक्षिण विधान सभा क्षेत्रात "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत प्रभाग क्र. ६२ चक्रपाणी नगर ते सिध्देश्वर नगर ते मॉ भगवती नगर रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त

एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. पी. के. नगरारे कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दरापेक्षा ०.०१ टक्के अधिक दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ८१,०६,६७०/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 58ः— शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात {लोककर्म झोन क्र. 4} मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 25 ब, टिळकनगर मुखय रस्त्याचे बाजुला लोकमान्य अपार्टमेंट ते वेस्ट हायकोर्ट पर्यंत पेव्हींग ब्लॉक लावण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी में. जानवी ईंटरप्राईजेस हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 12.70 टक्के कमी दराची निविदा रूपये 28,90,662/– ( रूपये अठ्ठाविस लक्ष नव्वद हजार सहाशे बासष्ट रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 59ः— नविन प्रशासकिय भवन नागपूर महानगरपालिका, सिव्हील {कार्य.अभि. नविन प्रशा.भवन प्रकल्प} लाईन्स, नागपूर येथे तळमजला (लोअर ग्राऊंड फ्लोअर), तिसरा, चौथा मजल्याचे कामे पूर्णत्वाचे स्थितीत आहे. तसेच पाचवा व सहावा मजल्याचे कामे सुरू असुन जून अखेर पर्यंत काम पूर्ण होईल. याकरीता तातडीने प्रत्येक मजल्यावर सबंधीत विभागाचे स्थानांतरण नविन प्रशासकिय भवन मध्ये करावयाचे आहे. नविन प्रशासकिय भवन नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे तळमजला (लोअर ग्राऊंड फ्लोअर) व प्रत्येक मजल्यावर अभिलेख कक्ष प्रस्तावित असुन त्या अभिलेख कक्षात अभिलेख सुरक्षित व सुव्यवस्थित ठेवण्याकरीता कॉम्प्याक्टरची (Compactor) आवश्यकता आहे.

करीता नविन प्रशासकिय भवन नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे तळमजला (लोअर ग्राऊंड फ्लोअर) व प्रत्येक मजल्यावर कॉम्प्याक्टर (Compactor) लावण्याच्या कामाकरीता रक्कम रू. ५.०० कोटीचे प्रावधान तात्काळ विशेष निधी मधुन मंजुर करून तरतुद मुक्त करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभेपूढे अंतिम मंजूरीकरीता पाठविण्याची शिफारस करण्यात येते या सुचनेसह विषय एकमताने मंजूर, सभागृहाने विशेष निधीस मंजूरी प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्राप्त करून निविदा काढाव्या यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 60ः— नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील पिवळी नदी, नाग नदी {पेंच प्रकल्प विभाग} व पोरा नदी येथील पुररेषा प्रस्थापित करून निळी पुररेषा व लाल पुररेषा मार्क करण्या संबंधात रू. ६०,६९,१४०/— रकमेच्या प्राकलनास स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांक १४.०७.२०१४ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. सदरील कामामध्ये पोरा नदी नरसाळा व हुडकेश्वर शहर हद्दवाढीचा भाग समाविष्ट करण्यात आला असल्याने तसेच इतर तांत्रिक सर्व्हेक्षणाचे कामात वाढ झाल्याने रू. ९९,५४,९६२/— रकमेचे सुधारित प्राकलन तयार करण्यात आले असून, त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी प्राप्त आहे.

करिता त्यास मंजुरी देण्याचा तसेच रू. ९९,५४,९६२/— वजा रू. ५७२५९९८/— म्हणजे रू. ४२२८९६४/— चे काम निविदेची अट शिथील करून मे. डीआरए कंसलटंट प्रा.लि. यांच्या मार्फत मंजुर निविदा दरावर म्हणजे प्राकलनीय राशी पेक्षा २४ टक्के कमी दराने रू. ३२,१४,०१६/— रकमेचे काम करून घेण्यास मंजुरी देण्याचा व कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ठराव क्र. 61

दिनांक 14.07.2014 प्रमाणे निविदाकाराने किती काम केले याचा स्वतंत्र अहवाल स्थायी समिती समोर एक महिन्याच्या आत प्रशासनाने सादर करावा, या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 61:— {लोककर्म नगर अभियंता} नागपूर शहर मंजूर विकास आराखडयानुसार डीपी रोड इ. पी./६८ मॉरीस कॉलेज टी पॉईंट ते इन्स्टिटयुट ऑफ सायन्स कॉलेज/नागपूर विद्यापीठ पर्यंत १८ मीटर रूंदीच्या रस्त्याच्या बांधकामास्तव रू. ८,३७,०६,१३८/— रकमेच्या प्राकलनास स्थायी समिती ठराव क्र. ४४१ दिनांक १२.०१.२०१५ अन्वये मंजुरी प्राप्त असून, यामधील अंतर्भूत असलेले नविन पुलाच्या बांधकामाकरिता रू. २,३६,०२,८३१/— खर्चास मंजुरी प्राप्त आहे. त्यानुषंगाने स्थायी समिती ठराव क्र. २८२ दिनांक ०९.११.२०१५ अन्वये मे. एम.आर.ढोबळे यांना प्राकलनीय दरापेक्षा ४.५ टक्के अधिक दराने रू. २,४६,६४,९२६/— रकमेचा कार्यादेश निर्गमित करण्यात आलेला आहे. मात्र प्रत्यक्ष काम करताना पुलाचे मध्यभागी ७०० मी. मी. व्यासाची जलवाहीनी तसेच मराविमं व बीएसएनएल चे केबल असल्याचे निदर्शनास आले, या भुमिगती सुविधांचे स्थलांतरण करण्याकरिता आवश्यक स्ट्रक्चर उभारण्याची बाब मुळ प्राकलनामध्ये समाविष्ट नसल्याने स्थलांतरण करण्याकरिता लागणारे स्ट्रक्चर तसेच केबल स्थलांतरण व सींगल स्पॅनचा पुल तयार करणे इ. कामाची व्याप्ती वाढल्याने रू. ३,७०,१३,३६३/— रकमेचे सुधारित प्राकलनास तसेच मुळ मंजूर निविदा राशीपेक्षा अतिरिक्त खर्चाचे काम मुळ कंत्राटदार मे. एम.आर.ढोबळे, यांचे कडून त्यांचे मंजूर निविदादरावर करून घेण्यास तसेच अतिरिक्त रू. १,०२,२३,७७१/— रकमेचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 62 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर